सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७०, ६८५९७४३१,

ई मेल -desk ११@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट:

क्रमांक:११/तंशिसं/निर्लेखन/८९संगणक/२०२४/ 06 दिनांक : - 2 APR 2024

## निर्लेखित संगणक विक्री सूचना

या कार्यालयातील जुने निर्लेखित संगणक (८९ नग) विकण्यासाठी अनुभवी व इच्छुक खरेदीदारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. या संदर्भातील अधिक माहिती या कार्यालयाच्या सूचना फलकावर व या कार्यालयातील कार्यासन क्रमांक ११ येथे कार्यालयीन वेळेत मिळू शकेल. सदरचे साहित्य इच्छुक खरेदीदारांना दि.०३/०४/२०२४ ते दि.१५/०४/२०२४ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी २.०० ते ३.०० या वेळेत दाखविण्यात येईल. सदर साहित्याची पाहणी करुन त्याबाबतचे दरपत्रक दि. १५/०४/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत सीलबंद लखोटयात सादर करावे. त्याच दिवशी दुपारी २.०० वाजता सदर संगणक संबंधीत दरपत्रके उघडण्यात येतील.

**निर्लेखित करावयाच्या संगणक विक्री प्रक्रियेतील अटी व शर्ती :**

१. खरेदीदाराने ई-कचरा व्यवस्थापन नियम २०२२ (E-waste Management Rules 2022) अन्वये पुनर्वापर करणारा (Recycler) म्हणून नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे.
२. या कार्यालयातील कालबाह्य, निरुपयोगी, निर्लेखित संगणकांची "जिथे आहे जसे आहे" स्थितीत विक्री करणे आहे.
३. विक्री करावयाची वस्तू कार्यालयात दि.३/०४/२०२४ ते दि.१५/०४/२०२४ या दरम्यान कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी २.०० ते ३.०० वाजेपर्यंत पहावयास मिळेल.
४. दरपत्रक प्रपत्र-अ मध्ये भरुन सीलबंद करुन द्यावयाचे आहे. सोबत अनामत रक्कम म्हणून रु.१,०००/- इतक्या रकमेचा डिमांड ड्राफ्ट "Director, Technical Education, M.S. Mumbai" या नावे काढून दरपत्रकासोबत सीलबंद पाकीटात द्यावा. अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट सीलबंद पाकिटात जमा न केल्यास ते दरपत्रक रद्द समजण्यात येईल.
५. पूर्ण भरलेले सीलबंद दरपत्रक स्विकारण्याची अंतिम मुदत दि. १५/०४/२०२४ पर्यंत दुपारी १.०० वाजेपर्यंत राहिल. दुपारी १.०० वाजल्यानंतर आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत. कोणत्याही प्रकारचा टपालाचा विलंब ग्राह्य धरला जाणार नाही.
६. सीलबंद दरपत्रकाच्या पाकिटावर **"लिलाव प्रक्रियेचे दरपत्रक - संगणक"** असा उल्लेख करावा.
७. दरपत्रकातील दर प्रत्यक्ष संगणक पाहून देण्यात यावेत.

८. सोबत दिलेल्या प्रपत्र - अ मध्ये खरेदीदाराने खरेदी किंमत नमूद करणे आवश्यक आहे.

९. दरपत्रक उघडण्याच्यावेळी केवळ दरपत्रक भरलेल्यांनाच उपस्थित राहता येईल. त्याकरीता लिलाव धारकाचा केवळ एकच प्रतिनिधी उपस्थित राहील व उपस्थित राहणाऱ्यास त्याचा ओळखीचा पुरावा दाखवावा लागेल.

१०. ज्यांचे दरपत्रक मंजूर झाले असेल, त्यांनी सदर वस्तू स्वत: आहे त्या स्थितीत व असेल त्या ठिकाणावरुन आदेश मिळाल्यापासून ०३ कार्यालयीन दिवसाचे आत स्वखर्चाने घेऊन जावे. साहित्य नेण्यापूर्वी साहित्याची संपूर्ण रक्कम डिमांड ड्राफ्टद्वारे भरणे आवश्यक आहे. साहित्य खरेदीची रक्कम रोखीने / चेकद्वारे स्विकारली जाणार नाही. ज्यांनी पूर्ण रक्कम भरली नसेल व सदर साहित्य विहित मुदतीत घेऊन गेले नाही, तर हे कार्यालय जबाबदार राहणार नाही व डिपॉझिट रक्कम शासन जमा केली जाईल. नंतर त्यावर त्यांचा हक्क राहणार नाही.

११. दरपत्रक मंजूर झाल्यास रक्कम भरुन सामान नेताना गेट पास घ्यावा व गेट पासवर संबंधितांची सही घ्यावी.

१२. साहित्य उचलतांना त्यावर कोणत्याही प्रकारचा टॅक्स वगैरे लागत असेल तर तो खरेदीदाराने स्वत: भरावा.

१३. दरपत्रक मंजूर झाल्यानंतर सर्व साहित्य सांभाळण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहील.

१४. तांत्रिक कारणास्तव लिलावातील वस्तू विकण्याचा अथवा न विकण्याचा अंतिम निर्णय हा या कार्यालयाचा राहील.

१५. कोणतेही कारण न देता दरपत्रक मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवलेला आहे. तसेच अटी व शर्तींचा भंग केल्यास ठेका रद्द करण्याचा अधिकारही राखून ठेवण्यात आलेला आहे.

१६. लिलावाच्या तारखेत बदल झाल्यास त्याबाबत संकेतस्थळावर सूचना प्रसिध्द करण्यात येईल.

१७. एका उघडया लिफाफ्यामध्ये पॅन कार्ड झेरॉक्स, व्यवसाय रजिस्ट्रेशन झेरॉक्स, जीएसटी रजिस्ट्रेशन झेरॉक्स, Desk ११ ला जमा करावेत. दुसऱ्या लिफाफ्यात प्रपत्र-अ भरुन आणि रु.१०००/- चा डिमांड ड्राफ्ट सीलबंद करुन ते या कार्यालयातील टेंडर बॉक्स मध्ये टाकावेत.

१८. इच्छुक खरेदीदारांनी केवळ या कार्यालयाकडून दिल्या जाणाऱ्या कोऱ्या प्रपत्र-अ मध्ये आपले दर भरुन सादर करावेत.

दरपत्रक सादर करावयाचा कालावधी : दि.०३/०४/२०२४ ते दि.१५/०४/२०२४ सकाळी ११.३० वा. ते दुपारी १.०० वाजेपर्यंत असेल.

दरपत्रके दि. १५/०४/२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता उघडण्यात येतील.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७०, ६८५९७४३१
ई मेल -desk ११@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट:

## प्रपत्र - अ
## लिलाव - दरपत्रक

मी स्वत: लिलाव करण्यात येणाऱ्या सर्व संगणकांची प्रत्यक्ष पाहणी केली आहे. मला सदर संगणकांची शासकीय किंमत माहित आहे. या सर्व प्रक्रियेकरीता लागू असलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. करीता खालीलप्रमाणे दरपत्रक भरत आहे.

(सदर दरपत्रकासाठी ज्या खरेदीदाराची निवड होईल, त्यांनी लवकरात लवकर कार्यालयात डिमांड ड्राफ्टद्वारे रक्कम भरुन संगणक साहित्य घेऊ जावे.)

| तपशिल | खरेदीदाराची ८९ संगणकांची एकूण खरेदी किंमत रुपये |
|---|---|
| कार्यालयातील निर्लेखित एकूण ८९ संगणक | |

सही :

नांव :

एजन्सीचे नांव :

दिनांक :